

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विचार साहित्य संम्मेलनातील काही क्षणचित्रे.....

"भारतीय वीर जवानांना समर्पीत"

**४थे राज्यस्तरीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज**


# विचार साहित्य संम्मेलन १७

**वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समिती, अकोला**

रजि.नं. ३१०/१४ एफ १७७१८

संपादक – डॉ.राजीव बोरकर

# समकालीन प्रश्न
आणि
# भारतीय लोकशाही



1/6

# समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही


## मुख्य संपादक

**संदीप तुंडूरवार**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**डॉ. रतन राठोड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

## सहसंपादक

**डॉ. अमर बोन्द्रे**
राज्यशास्त्र विभाग,
व्ही.एम.व्ही. महाविद्यालय,
नागपूर

**डॉ. संजय नाकाडे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव,
जि. चंद्रपूर

**डॉ. दिनकर चौधरी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी,
जि. चंद्रपूर

**डॉ. बाळासाहेब जोगदंड**
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अकोला

❖ प्रकाशक :
मेहेरबाबा पब्लिशर्स
हसनबाग पोलिस चौकी जवळ,
हसनबाग रोड, न्यु नंदनवन, नागपूर-९
मो. ९९२३६३०३१५, ८०८७४६०४७०
Email: meherbabapublishers0616@gmail.com

समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही

❖ प्रथम आवृत्ती : ३० डिसेंबर २०१७

❖ © राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद (विदर्भ प्रांत), नागपूर
रजि. नं.महा. ६५१/१७ (नागपूर)

❖ अक्षर जुळवणी
'हरि ओम' कॉम्प्युटर्स,
नागपूर मो. ९६७३५५०७२०

❖ ISBN- 978-93-87558-03-8

₹ : ६००/-

या पुस्तकातील लेखामध्ये व्यक्त झालेली मते व मजकुर लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, परिक्षण व संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील मजकुराची जबाबदारी सर्वस्वी लेखकांची आहे.

५९) लोकशाही शासन व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची भूमिका
डॉ. शीला संजय खेडीकर ३०१
डॉ. अमर बोंदरे
६०) राजकारणाचे गुन्हेगारीकरण: भारतीय लोकशाहीपुढील एक आव्हान
डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड ३०६
६१) भ्रष्टाचार एक गंभीर समस्या
प्रा. देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके ३१५
६२) भ्रष्टाचार एक जागतिक समस्या
डॉ. महेंद्र भिमराव भगत ३२८
६३) भारतीय लोकशाही शासनव्यवस्थे समोरील भ्रष्टाचार: एक आव्हान
डॉ. आर.डी.इंगोले ३३२
६४) भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार
प्रा. सुजाता केने ३३६
६५) भ्रष्टाचार : चिंता आणि चिंतन
डॉ. बळीराम परशराम अवचार ३४२
६६) भ्रष्टाचार : एक सामाजिक अध्ययन
प्रा. स्नेहल मनिष चिमणकर (खंडारे) ३४९
६७) भ्रष्टाचार : भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान
प्रा. श्रीहरी मा. सानप ३५५
६८) अर्थगैरव्यवहाराची समिक्षा....!
डॉ. पोर्णिमा मेश्राम (गणविर) ३५९
६९) ग्रामीण भारतातील बेकारी, दारिद्र्य आणि शासकीय योजना
प्रा. कु दिपाली श्रीराम घोगरे ३६३
७०) बेकारी एक ज्वलंत सामाजिक समस्या
प्रा. नवनाथ बंकट बडे ३७१
७१) दारिद्र्याची समस्या
प्रा. रावसाहेब ठोके ३७९
७२) भारतातील दारिद्र्य निर्मूलन : समस्या व उपाय
डॉ. संदीप भिमराव काळे ३८९
७३) वस्तू व सेवा कराचे महत्त्व
डॉ. प्रसन्नजीत गवई ३९५

# ग्रामीण भारतातील बेकारी, दारिद्रय आणि शासकीय योजना

प्रा. कु. दिपाली श्रीराम घोगरे,
सहाय्यक प्राध्यापक,
डॉ. एच.एन. सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय, पातूर

**प्रस्तावना**

आजच्या विकसित देशाच्या तुलनेत भारत हा एक प्राचिन देश आहे. प्राचिन काळात भारतीय खेडी स्वावलंबी होती. भारतातील उदयोग व्यवसाय आणि शेती समृध्द होते. त्यामुळे गावातील प्रत्येक घटक परस्परपुरक आणि परस्परांवर अवलंबून होते. गावातल्या गावातच वस्तूंचे उत्पादन व वितरण होत असे. तसेच मनोरंजन, सुरक्षा, न्याय आणि सामाजिक व सांस्कृतिक पध्दती याविषयीची प्रत्येक गावाची स्वतंत्र व्यवस्था होती. त्यामुळे गावातील वातावरण आनंदाचे व समाधानाचे होते. गावाची ही स्थिती अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत टिकून होती. त्यानंतर मात्र मुघल काळ आणि नंतर ब्रिटीश काळात ग्रामीण विकासाच्या व समृध्दीच्या गतीला खिळ बसली.

ब्रिटीशांच्या आगमनानंतर तर भारतीय खेडयांची अवस्था दयनिय झाली. ब्रिटीशांचे सामाज्यवादी व वसाहतवादी धोरणा आणि औद्योगिक क्रांतीच्या प्रभाव व प्रसारामुळे भारतीय जीवनाचा मुख्य आधार असलेल्या शेतीचा विकास खुंटला. तसेच गावा-गावात चालणारे लघू व कुटीरोद्योग डबघाईला आले. शेती व गावातील उदयोग धंदयांना खिळ बसताच गावांमध्ये दारिद्रय, बेकारी, उपासमार, कुपोषण, आरोग्याच्या समस्या निवाऱ्याच्या समस्या अशा अनेक समस्यांनी जन्म घेतला. उदयोगधंदे बंद पडल्याने गावातील परस्परपूरक व परस्परावलंबी असे आनंदी जीवन विस्कळीत झाले. प्राचिन स्वयंपूर्ण व स्वावलंबी भारतीय खेडी अनेक समस्यांनी ग्रासली गेली. ब्रिटीशांची औद्योगिक निती व साम्राज्यवादी धोरण यामुळे ब्रिटीशांनी भारतीय शेती व उदयोग धंदयांच्या विकासाकडे पर्यायाने भारतीय खेडयांच्या विकासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण सामाजिक रचना छिन्न विछिन्न झाली. भारतीय ग्रामीण जनतेच्या बेकारी, दारिद्रय, कुपोषण, आरोग्य समस्या या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी ब्रिटीश शासनाने विशेष अशा

कोणत्याच उपाययोजना केल्या नाहीत. परिणामत: जेंव्हा भारत स्वतंत्र झाला तेंव्हा स्वातंत्र्या बरोबर दारिद्र्य, बेकारी, उपासमारी, कुपोषण या समस्याही भारतीय लोकशाही आल्या.

**संशोधनाचे उद्देश**

* भारतीय लोकशाही पूढील दारिद्र्य व बेकारी या समस्यांचे अध्ययन करणे.
* दारिद्र्य व बेकारी यांचे निर्मूलनाकरीता असलेल्या शासकीय योजनांचे अध्ययन करणे.
* दारिद्र्य व बेकारी निर्मूलनातील समस्यांचे अध्ययन करणे.
* दारिद्र्य व बेकारी आणि कुपोषणाच्या निर्मूलनाकरीता उपाययोजना सुचविणे.

वरील उद्देश डोळयांसमोर ठेवून प्रस्तूत अध्ययन करण्यात आले आहे.

**दारिद्र्य आणि बेकारी ब्रिटीश**

ब्रिटीश राजवटीतून भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यांच्यासमोर निर्माण झालेल्या अनेक समस्यांपैकी दारिद्र्य व बेकारी आणि कुपोषण या तीन महत्वाच्या समस्या आहेत. भारत हा खेडयांचा देश आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्या १२१ कोटी आहे. त्यापैकी ८३ कोटी ९० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या खेडयात राहते. ही एकूण लोकसंख्या ६९ % आहे. अर्थातच दारिद्र्य व बेकारी यांचे प्रमाणही ग्रामीण भागातच जास्त पहावयास मिळते. यादृष्टीने ग्रामीण भागाची प्रगती आणि समृध्दी हीच भारताच्या लोकशाहीच्या विकासाचा आधार आहे. मात्र आजही ग्रामीण भारताच्या विकासात दारिद्र्य व बेकारी हया समस्या आव्हान ठरत आहेत. वास्तवत: दारिद्र्य व बेकारी हया परस्पर आधारीत अशा समस्या आहेत. देशात रोजगाराची कमतरता असल्याने बेकारी वाढते, बेकारी वाढली की बेकार जनतेच्या दारिद्र्यात वाढ होते आणि दारिद्र्यातूनच कुपोषण, उपासमार, आरोग्याच्या समस्या अशा समस्या जन्म घेतात.

**दारिद्र्य व बेरोजगारी निर्मूलनाकरीता असलेल्या शासकीय योजना**

२६ जानेवारी १९५० रोजी भारताने संविधानाचा स्विकार करून भारतात लोकशाही गणराज्याची स्थापना केली. त्याचवेळी देशाने लोकल्याणकारी राज्याची भूमिका स्विकारली आहे. म्हणूनच भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतातील विशेषत: ग्रामीण भागातील बेरोजगारी व दारिद्र्य व कुपोषण हया समस्या सोडविण्यासाठी शासनाने नियोजित योजना पध्दतीचा अवलंब करून अनेक योजना व कार्यक्रम राबविले आहेत. त्यातील काही निवडक योजनांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**सामुदायिक विकास कार्यक्रम (Communities, Development Programme 1952)**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशांच्या सर्वांगिण विकासाकरीता १९५० मध्ये योजना आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर २ ऑक्टोंबर १९५२ मध्ये सामुदायिक विकास कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जास्तीत जास्त लोकांचे कल्याण करण्यासाठी मुलभूत सोयी – सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी दुर करण्याकरीता पडीत जमीन कृषीयोग्य बनविणे, नविन सुधारीत कृषी यंत्रे व उपकरणांची व्यवस्था करणे शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, लघु व कुटीर उदयोगांना प्रोत्साहन देणे, त्याचबरोबर ग्रामीण भागात निवाऱ्याची समस्या, शिक्षण व्यवस्था व आरोग्य व्यवस्था याकरीता उपाययोजना करण्यासाठी या कार्यक्रमातून कार्य करण्यात आले.

**सखोल कृषी जिल्हा कार्यक्रम (IADP) (1960-61)**

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना नव-नविन कृषि तंत्रज्ञानाची माहिती देणे, कृषी कर्ज व अनुदान देवून उत्पादन वाढविणे व पर्यायाने दारिद्र्य व बेरोजगारी दूर करणे हा होता.

**मागास क्षेत्र विकास कार्यक्रम (१९६२)**

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मागास (आदिवासी) क्षेत्रात सोई - सुविधांची निर्मिती करून त्याक्षेत्राचा विकास करणे हा होता.

**सखोल कृषी क्षेत्र कार्यक्रम (१९६४)**

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश काही विशिष्ट पिकांचे उत्पादन वाढवून शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा करणे हा होता.

**लहान शेतकरी विकास कार्यक्रम आणि सिमांत शेतकरी व भूमिहीन मजूरांच्या विकासासाठी कार्यक्रम (SFDP व MFA LDP)**

या दोन्ही कार्यक्रमांची सुरूवात १९६९ मध्ये झाली या दोन्ही कार्यक्रमांचे उद्देश लहान शेतकऱ्यांच्या विकासासाठी विविध समस्या सुधारणा, भूमिहीन मजूरांच्या विकासासाठी विविध कार्यक्रम सुरू करून बेरोजगारी व दारिद्र्य दूर करणे हा होता.

**अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (१९७०)**

या कार्यक्रमाचा उद्देश दुष्काळग्रस्त भागातील प्रश्न सोडविणे हा होता. त्याकरीता भूमिसंरक्षण, वृक्षारोपन, पिण्याच्या पाण्याची सोय करणे हा होता.

**विसकलमी कार्यक्रम (Twenty Point Programe 1975)**

या कार्यक्रमाची सुरूवात १९७५ मध्ये करण्यात आली. नंतर १९८२ व १९८६ मध्ये या विकसकलमी कार्यक्रमात सुधारणा करून पूनर्रचना करण्यात आली. या कार्यक्रमाचा उद्देश सुध्दा देशातील दारिद्र्य रेषेखालील व गरीब लोकांचे जीवनमान सुधारणे हा होता. त्याकरीता या कार्यक्रमात गरीबी, रोजगार, शिक्षण, आरोग्य, निवारा, कृषी व भूमी सुधारणा, सिंचन व्यवस्था, पिण्याचे पाणी, पर्यावरण अशा घटकांवर भर देण्यात आला.

**कामाच्या बदल्यात अन्न योजना (Food for work programme) १९७७**

कामाच्या बदल्यात अन्न योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील बेरोजगारांना काम देणे व त्यांची अन्न - धान्याची समस्या सोडविणे हा होता.

**ओसाड भूमि विकास कार्यक्रम (Desert Development Programme) १९७७**

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ओसाड भूमिवर नियंत्रण मिळवून तिचा विकास करणे व तिथे राहणाऱ्या लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हा होता.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना (National Rural Employment Programme) १९७७**

ही योजना ग्रामीण भागातील बेरोजगार जनतेला रोजगार उपलब्ध करून देण्याकरीता सुरू करण्यात आली होती.

**अंत्योदय योजना १९७७**

अंत्योदय योजनेचा मुख्य उद्देश देशातील विशेषतः ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा आर्थिक विकास करणे व दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे हा होता.

**एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (Integrated Rural Development Programme) १९७८.७९**

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची सुरूवात सन १९७८-७९ मध्ये करण्यात आली. देशातील दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या निवडक ग्रामीण कुटूंबांना स्वयपूर्ण व स्वावलंबी बनवून त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणने हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. सुरूवातीला हा कार्यक्रम देशातील २० जिल्हयात राबविण्यात आला. नंतर १९८२ पासून संपूर्ण देशात हा कार्यक्रम राबविला गेला.

**ग्रामीण युवकांना स्वयंरोगारासाठी प्रशिक्षण कार्यक्रम (Training of Rural youth for Self employment) १९७९.८०**

ग्रामीण भागातील बेरोजगाराची समस्या कमी करण्यासाठी ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देणे व त्यांना स्वतःच्या व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

**सुशिक्षित बरोजगार युवकांना स्वयंरोजगार कार्यक्रम (Self employment to educated unemployed youth Programme) १९८१**

सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार उपलब्ध होवून त्यांची बेरोजगारीची समस्या दूर व्हावी म्हणून ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेतून सुशिक्षीत बेरोजगार युवकांना बँकेतून अर्थसहाय्य देवून त्यांना स्वयंरोगाराच्या संधी देण्यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात आला.

**ग्रामीण भुमिहीन रोजगार हमी योजना (Rural Landless Employment Gaarantee Programme) १९८३**

या योजनेची सुरूवात १९८३ मध्ये करण्यात आली. भूमिहीन मजूरांना रोजगार उपलब्ध करून बेरोजगारांची समस्या कमी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता.

**१६. इंदिरा आवास योजना (Indira Awas Yojana) १९८६**

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती - जमाती, मुक्त वेठबिगार तसेच अनुसूचित जाती / जमातीत नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला घरकूल बांधून देणे किंवा जुन्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करून देण्यासाठी इंदिरा आवास योजना १९८६ मध्ये सुरू करण्यात आली. आता ही योजना पंतप्रधान आवास योजने मध्ये विलीन करण्यात आली आहे.

**जवाहर विहीर योजना (१९८९-९०)**

देशातील सिंचनाचे प्रमाण वाढावे व बागायती शेतीचे क्षेत्र वाढवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून शेतकऱ्यांच्या शेतात विहीर खोदून देण्याकरीता रोजगार हमी योजनेतून १९८९-९० पासून जवाहर विहीर योजना सुरू करण्यात आली. देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे हा त्यामागचा उद्देश होता.

**जवाहर रोजगार योजना (Jawahar Rojgar Yojana) १९८९-९०**

पूर्वसंचालीत राष्ट्रीय ग्रामीण योजना रोजगार कार्यक्रम व ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम या दोन्ही योजना एकत्र करून जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आली. त्या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील बेरोजगाराची समस्या दूर करण्यासाठी रोजगार कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे व सार्वजनिक संपत्ती निर्माण करणे हा होता.

**ग्रामीण महिला बचत कार्यक्रम (१९९३)**

ग्रामीण भागातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा आणि त्यांच्यात स्वावलंबन यावे म्हणून १९९३ साली ग्रामीण महिला बचत कार्यक्रम सुरू करण्यात आला.

**ग्रामीण रोजगार कार्यक्रम (१९९३)**

ग्रामीण रोजगार कार्यक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण बेरोजगारी व दारिद्र्याचे निर्मुलन करणे हा होता. त्याकरीता त्या कार्यमांतर्गत ग्रामीण भागातील इच्छूक व्यक्तींना रोजगार या कार्यक्रमातून देण्यात आला.

**रोजगार आश्वासन योजना (१९९३)**

ही योजना १९९३ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनाचा उद्देश ग्रामीण भागाची आर्थिक स्थिती सुधारणे व ग्रामीण भागातील जीवनामानात सुधारणा करणे हा होता. सुरूवातीला देशातील २६१ जिल्हयामध्ये ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर १९९७-१९९८ मध्ये ही योजना संपूर्ण देशात सुरू करण्यात आली.

**जवाहर ग्रामसमृध्दी योजना (१९९९)**

१९९९ मध्ये सुरू करण्यात आलेल्या जवाहर ग्रामसमृध्दी योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागाच्या विकासाकरीता प्रयत्न करणे व ग्रामीण दारिद्रय व बेकारीचे दृष्टचक्र तोडणे आणि त्याकरीता ग्रामीण भागातील गरीब बेरोजगारांना रोजगारांच्या संधी निर्माण करून देणे हा होता.

**स्वर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजना (SGSY) १९९९**

आतापर्यंत देशात दारिद्रय निर्मूलनाच्या विविध योजना राबवून ही देशातील गरीबीचे प्रमाण कमी होत नव्हते. त्यामुळे दारिद्रय निर्मूलनाकरीता प्रभावी उपाययोजना करण्यासाठी पूर्वसंचालीत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ग्रामिण युवकांना स्वंरोजगार हेतू प्रशिक्षण कार्यक्रम (ट्रायसेम) महिला व बालविकास कार्यक्रम (डवाक्रा) ग्रामीण कारांगिरांसाठी सुधारीत हत्यार संच (सिट्रा) गंगा कल्याण योजना व दशलक्ष विहीर योजना या सर्व योजना बंद करून केंद्र सरकाने ९ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्रामस्वंरोजगार योजना सुरू केली. या योजनेचे मुख्य उद्देश ग्रामीण भागात मोठयाप्रमाणावर लहान व्यवसाय उदयोग स्थापन करून त्याद्वारे तेथील गरीबांना स्थिर व कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देणे हा आहे.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGSY) २००१**

दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या मार्गदर्शक मसुदयामध्ये केंद्रसरकारने दारिद्रय निर्मूलन योजनेच्या मार्गदर्शक तत्वाचा भाग म्हणून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना दर्शविली होती. त्यानुसार १५ ऑगष्ट २००१ ला केंद्रसरकारने पूर्वसंचालित आश्वासित रोजगार योजना व जवाहर ग्रामसमृध्दी योजना यांचे समायोजन करून संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना देशभरात लागू केली.

या योजनेचा मुख्य उद्देश देशातील ग्रामीण भागात अतिरिक्त रोजगार पूरवून अन्न संरक्षण निर्माण करणे व पोषणपातळी वाढविणे हा असून दुय्यम उद्देश ग्रामीण भागात टिकाऊ मालमत्ता निर्माण करून पायाभूत सोई - सुविधांचा विकास करणे हा आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२००६)**

केंद्रसरकारने २००५ साली राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ पास करून संपूर्ण देशात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू केली. सुरूवातीला २०० जिल्हयात २ फेब्रुवारी २००६ पासून ही योजना अंमलात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात २००७ ला १३० जिल्हयात आणि त्यानंतर १ एप्रिल २००८ पासून संपूर्ण देशात ही योजना सुरू झाली. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण कुटुंबातील अकुशल काम करण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीस १०० दिवसाच्या रोजगाराची हमी देणे हा आहे.

अशा प्रकारे सवतंत्र्योत्तर काळात ग्रामीण भारतील बेकारी व दारिद्र्य निर्मूलनाकरीता शासनाने अनेक योजना व उपक्रम राबविले आहेत आणि आजही राबवित आहे. मात्र साध्यांचा विचार केला असता असे निदर्शनास येते की, देशातील ग्रामीण भागात दारिद्र्य व बेकारीची समस्या अजूनही कायम आहे. शासकीय योजनांमुळे त्यांचे प्रमाणे कमी झाले असले तरी या दोन्ही समस्यांचा समूळ नायनाट करणे अजूनही भारतीय लोकशाहीला शक्य झाले नाही त्याला अनेक अशी कारणे कारणीभूत आहेत. त्यातील काही प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**सदोष नियोजन**

देशात ग्रामीण दारिद्र्य व बेकारी निर्मूलनाकरीता अवलंबल्या गेलेली नियोजन प्रणाली सदोष आहे. योजना व उपक्रम घाई - घाईने बनविले जातात. या योजना बनवतांना वास्तविक गरजा व समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे त्या परिणाम हीन सिध्द होतात.

**लोकसंख्या वाढ**

देशातील लोकसंख्येचा दर तिव्रगतीने वाढत आहे. त्यामानाने देशातील साधन संपत्ती सीमित आहे. परिणामतः वाढत्या लोकांच्या बेकारी व दारिद्र्यात वाढ होत आहे.

**साधन-साध्ये यातील असमतोल**

ग्रामीण विकास योजनांवर दृष्टीक्षेप टाकल्यास दिसून येते की, प्रत्येक योजनेचे लक्ष्य व्यापक असते मात्र त्या लक्ष्यांना साध्य करण्यासाठी आवश्यक असलेली साधन सामुग्री सीमित असल्याने ग्रामीण जनतेला या योजनांमधून फारसा लाभ मिळत नाही.

**नोकर शाहीचे वर्चस्व व लालफितशाही**

ग्रामीण बेकारी व दारिद्र्य निर्मूलनात नोकरशाहीचे वर्चस्व व लालफितशाही ही एक मोठी समस्या आहे. त्यामुळे योजना जलद गतीने कार्यान्वित होत नाहीत. परिणामतः अशिक्षित ग्रामीण जनतेस या योजनांचा लाभ मिळत नाही.

**निरक्षरता**

आपल्या देशातील निरक्षरता ही खूप मोठी समस्या आहे. ग्रामीण आर्थिक व सामाजिक विकासाकरीता ग्रामीण जनतेचा विवके पूर्ण दृष्टीकोण असने अत्यावश्यक आहे. निरक्षरतेमुळे ग्रामीण जनता विकास योजनांना योग्यप्रकारे समजून घेवू शकत नाही. त्यामुळे काही साक्षर लोक या योजनांचा लाभ घेतात व इतर लोक या योजनांपासून अलिप्तच राहतात.

**राजकीय गटबाजी व जातीवाद**

देशात लोकशाही शासन प्रणाली असल्याने अनेक पक्ष निर्माण झाले आहेत. मात्र या विविध राजकीय पक्ष आदर्श सिध्दांतावर आधारीत नसून गटबाजी व जातीवादावर आधारीत आहे. परिणामत: योजना कितीही चांगली असली तरी गटबाजीच्या राजकारणात ती पूर्णपणे सफल होवू शकत नाही.

**जनतेमध्ये जागरूकतेचा अभाव**

ग्रामीण दारिद्र्य व बेकारी निर्मलनातील सर्वात मोठी समस्या म्हणजे दारिद्र्य व बकारी निर्मलनाकरीता असलेल्या योजनाविषयी जनतेमध्ये असलेला जागरूकतेचा अभाव ही आहे. तसेच शासकीय योजनांच्या अंमल बजावणीत जनतेचा सहभाग हा फारच अल्प आहे. लोकशाहीत शासकीय योजनांची यशस्विता ही लोकसहभागावर आधारीत असते मात्र भारतातील ग्रामीण जनतेत जागृतीचा अभाव असल्याने ग्रामीण क्षेत्रातील बहुतांश जनता दारिद्र्य व बेकारी मुळे ग्रस्त आहे.

वरील विश्लेषणावरून स्पष्ट होते की, ग्रामीण दारिद्र्य व बेकारी निर्मूलनात अनेक समस्या आहेत. त्यामुळे शासकीय योजना पूर्णपणे यशस्वी होवू शकत नाहीत. त्यामुळे जर ग्रामीण दारिद्र्य आणि बेकारीचे निर्मूलन करायचे असेल तर योजनांच्या अंमल बजावणीतील समस्यांवर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**उपाय योजना**

* ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी निर्मूलनाकरीता योग्य असे नियोजन करणे गरजेचे आहे. त्याकरीता सर्वप्रथम ग्रामीण भागातील अडचणी व आवश्यकतेचा अभ्यास करून त्याआधारे योजनांची निर्मिती व अंमल बजावणी करणे शासनाकडून अपेक्षीत आहे.

* दारिद्र्य व बेकारी निर्मूलनाकरीता शासन अनेक उपाययोजना करीत असले तरी लोकसंख्या खूप मोठया प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे कितीही उपाययोजना केल्या तरी त्या कमी पडत आहेत. त्यामुळे दारिद्र्य व बेकारीचे निर्मूलन करण्याकरीता लोकसंख्या नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक आहे.

* लोकसंख्येचा वाढता दर पाहता त्यामानाने त्यांच्या गरजा पूरविणारी साधने सीमीत आहेत. त्यामुळे लक्ष आणि साधने यात असमतोल निर्माण होत आहे. त्यामुळे योजना अपयशी ठरत आहेत. त्यामुळे योजनांची निर्मिती करतांना लक्ष आणि साधने यातील तफावत कमी करण्याचा प्रयत्न केला तर योजना यशस्वी होवू शकतात.

योजनांच्या अंमलबजावणीत व यशस्वितेत प्रशासन व नोकरशाहीचे कार्य अत्यंत महत्वपूर्ण असते. परंतू नोकर वर्गाचे वर्चस्वाचे धोरण व आळशी आणि भ्रष्ट्राचारी प्रवृत्तीमुळे अनेक योजना जनतेपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे नोकरशाहीचे वर्चस्व व लालफितशाहीला आळा घालने आवश्यक आहे.

* निरक्षरता ही ग्रामीण भागातील खूप मोठी समस्या आहे. निरक्षरतेमुळे ग्रामीण जनता शासकीय योजनांना योग्य प्रकारे समजून घेवू शकत नाही. त्यामुळे या योजनांच्या अंमल बजावणीत आपला सहभाग महत्वाचा आहे. याचीही जाणीव जनतेस नाही. म्हणूनच जनता या योजनांच्या अंमल बजावणीत सहभागी होत नाही. त्यामुळे जनतेमध्ये साक्षरतेचा व राजकीय व सामाजिक जाणीव जागृतीचा प्रसार होणे अत्यंत आवश्यक आहे.

* ग्रामीण भागत राजकीय गटबाजी व जातीयवादामुळे अनेक योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे योजनांच्या यशास्वितेसाठी राजकीय गटबाजी व जातीयवादाला आळा बसणे आवश्यक आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) भारत की जनगनणा - २०११

२) भारतीय अर्थव्यवस्था, वार्षिक प्रतियोगिता साहित्य सिरीज, आगरा

३) जमूआर डॉ. रवि शंकर, भारत मे ग्रामीण विकास, रिंगल पब्लीकेशन्स, न्यु दिल्ली.

४) डॉ. अवधेश तिवारी, ग्रामीण विकास कार्यक्रम एवं सामाजिक परिवर्तन, विवके प्रकाशन, न्यु दिल्ली.

५) गुप्ता यु.सी. वर्मा, प्रतिक, ग्रामीण विकास परियोजना, अर्जुन पब्लीशिंग हाऊस, न्यु दिल्ली.

६) कुलश्रेष्ठ नितिश, पंचायतीराज एवं ग्रामिण विकास योजनाए, रितू पब्लीकेशन्स, जयपूर

७) सिंह कटार, ग्रामीण विकास, रावत पब्लीकेशन्स, जयपूर

८) शर्मा रेखा, ग्रामीण विकास एवं नियोजन, रावत प्रकाशन, नई दिल्ली.

९) देशमुख डॉ. अलका, स्थानिक स्वशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

१०) देवगावकर डॉ. श.गो. पंचायतराज्य आणि सामूहिक विकास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर


★★★